# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/04/2023 (शनिवार) सायंकाळ

---

### फसवणुक

१) पो.स्टे. बेला :– अंतर्गत १० किमी अंतरावर मौजा पिपरा येथे दिनांक ०६.०३.२०२३ ते दिनांक २०/०४/२०२३ पावतो यातील **आरोपी क्र. १) अतुल बंडुजी पीसे, वय ३४ वर्षे रा. रेठे कॉलनी हिगणघाट मुळ गाव जलका डोंगरगाव वर्धा याने त्याचे साथीदार २) शुभम शांताराम काटवले, वय २५ वर्षे रा. नांद जि. नागपुर ३) दिपक शालीक चंदनखेडे वय २० वर्षे डोंगरगाव** वर्धा यांचेसह संगनमत करून फिर्यादी नामे– कुंडलीक अळीराम काकडे, वय ५२ वर्षे रा. पिंपरा ता. उमरेड जि. नागपुर व इतर शेतकरी यांचा कापुस खरेदी करून हिंगनघाट येथे कापसाची विक्री करुन फिर्यादी व इतर १० शेतकऱ्यांना खोटे धनादेश देवुन फिर्यादी व १० शेतकरी यांची एकुण १४ लाख २८ हजार रूपयाची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीतांविरुध्द कलम ४२०, ३४ भादवि. सह कलम १३८ निगोशिएबल इंस्टुमेंट ॲक्ट १८८१ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास ना.पो.शि/८२ बाबा नेवारे पो.स्टे. बेला मो. नं. ७७४१९४९०१५ हे करीत आहे.

२) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत स्पंदना स्फुर्ती फायनांसियल लिमीटेड शाखा काटोल येथे दिनांक ०४/०९/२०२२ ते दिनांक ०४/१२/२०२२ चे १२/३० वा. पर्यंत यातील फिर्यादी नामे– अविनाश गौतमराव तायवाडे, वय २६ वर्षे रा. जोलवाडी ता. आष्टी जि. वर्धा ह. मु. काटोल व **आरोपी नामे– राजु गेठु चंद्रपुरी, वय २२ वर्ष, रा. माडेगाव ता. सावनेर** मौजा स्पंदना स्फुर्ती फायनांसिल लिमीटेड शाखा काटोल येथे काम करत असुन यातील आरोपी याला कर्ज वसुलीचे काम दिले असता त्याने ग्राहकांकडुन कर्जाची हप्ते वसुली करून किंमती १,१७,७९५/– रू. घेवुन पळुन गेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४०८ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा ज्योती सेवतकर ब. नं. १७३२ पोलीस स्टेशन काटोल हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**